ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत / नगरपरिषदेमध्ये झाल्यानंतर रमाई आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुल बांधकामासंदर्भात संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः रआयो-२०१६/प्र.क्र.६६३/बांधकामे

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २ मार्च, २०१७

**वाचा :-**

१) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नंदुरबार यांचे ग्राम विकास व जलसंधारण यांना उद्देशून लिहिलेल्या पत्र क्र जिग्रावियंन/१५७/२०१५, दि. १०/९/२०१५

२) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई यांचे पत्र क्र सांख्यिकी/रमाई/८९६/२०१६, दि. १९/१२/२०१६

**प्रस्तावना :-**

प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नंदुरबार यांनी संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये, नंदुरबार जिल्हयातील ता. धडगांव अंतर्गत वडफळया ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाल्यामुळे रमाई आवास योजनेंतर्गत मंजूर ५९ घरकुलांना बांधकाम करण्यास परवानगी देणे व निधी वितरण करणे याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण, नवी मुंबई यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. अशा प्रकारची प्रकरणे महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणीही उपस्थित होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत रमाई आवास योजना (ग्रामीण) चे निधी व्यवस्थापन राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांच्यामार्फत केले जाते. सबब, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अभिप्रायांच्या आधारे याबाबत सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.:-

**शासन परिपत्रक :-**

ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत / नगरपरिषदेमध्ये झाल्यानंतर रमाई आवास योजनेतर्गत मंजूर घरकुल बांधकामासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) रमाई आवास योजनेंतर्गत घरकुल ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतमध्ये होण्यापूर्वी लाभार्थ्यांस प्रथम मान्यता देणेत आली आहे. परंतु लाभार्थ्यांने घरकुल बांधकामास सुरुवात केली नसल्यास लाभार्थ्यास पंचायत समितीव्दारे घरकुल पूर्ण करुन द्यावे.

२) एखादया ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये होण्यापूर्वी लाभार्थ्यांना मंजूरी दिली आहे व पहिला हप्ता वितरीत करण्यात आला असेल तर सदर लाभार्थ्यांनी घरकुलांचे बांधकाम सुरु केलेले असल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना पुढील निधी वितरणाची प्रक्रिया चालू ठेवावी तसेच अशा ठिकाणची काम पूर्वी ज्या तालुक्यामध्ये संबंधित गाव होते त्या तालुक्याचे गटविकास अधिकारी यंत्रणा व नव्याने नेमण्यात आलेले रुरल इंजिनिअर यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३) ज्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायत / नगरपरिषद मध्ये रुपांतरण झालेले आहे अशा ठिकाणी नगरपरिषदेमध्ये रुपांतरण झाल्यानंतर जिल्हास्तरावरुन मंजूरी देण्यात येऊ नये व घरकुलांना बांधकाम सुरु करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. याबाबत संबंधित नगरपंचायत /नगरविकास विभागास पुढील कार्यवाहीसाठी अवगत करावे.

२. उपरोक्त सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.को. आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / मुख्य अधिकारी सर्व जिल्हा परिषद / नगरपंचायत / नगरपरिषद, महाराष्ट्र राज्य

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष — ग्रामीण गृहनिर्माण कक्ष, नवी मुंबई.
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
प्रादेशिक उपायुक्त. (सर्व) समाजकल्याण विभाग

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६) मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७) महालेखापाल,महाराष्ट्र,१,मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व महानगर पालिका आयुक्त
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
१३) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
१४) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१५) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग
१६) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१७) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद
१८) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य,पुणे
१९) सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२०) निवडनस्ती (बांधकामे).